# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला
ई-मेल: directorcrs78@gmail.com, directorcrs@pdkv.ac.in


जा.क्र.मसंके/विकास/ 715 /२०२६ दि. 06/08 /२०२६

## लिलावाची नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत **पश्चिम** विभागाच्या प्रक्षेत्रावरील **हिरव्या गवताचा** जाहीर लिलाव दि. १३.०८.२०२६ रोजी स. ११.३० वा. करण्याचा ठरविण्यात आला आहे. सदर हिरव्या गवताचा जाहीर लिलाव मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत **सामान्य विभाग** कार्यालय येथे करण्यात येणार आहे.

तरी इच्छुक व्यापाऱ्यांनी विभागावरील हिरव्या गवताची लिलावाचे पूर्वी पाहणी करून **बंद लिफाफामध्ये लिलाव (बोली) रक्कम दि. १०.०८.२०२६ ते १२.०८.२०२६ संध्याकाळी ०६.०० वाजेपर्यंत संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला कार्यालयामध्ये जमा करावे** व दुसऱ्या दिवशी सर्व लिलावधारकांच्या समक्ष दि. १३.०८.२०२६ रोजी स. ११.३० वा. लिलाव बोलीचे बंद लिफाफे उघडण्यात येतील व सर्वात जास्त लिलाव (बोली) रक्कम असेल त्या लिलावधारकास विभागावरील हिरवे गवत चराईकरीता दिले जाईल. करिता इच्छुकांनी सदर लिलावामध्ये भाग घेण्याकरिता स्वखर्चाने अटी व शर्तीचे अधीन राहून जास्तीत जास्त संख्येने हजर रहावे.

**हिरव्या गवताचे** विवरण व बंद लिफाफ्यामध्ये भरावयाचा नमुना खालील प्रमाणे आहे.

| अ क्र. | विभागाचे नाव | तपशील | दर प्रति हेक्टर (रु.) |
|---|---|---|---|
| १ | पश्चिम | विभागावरील हिरवे गवत चराई करीता | |

लिलावाच्या अटी व शर्ती मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत सामान्य विभागाचे तसेच संबंधित विभागाच्या सूचना फलकावर लावण्यात आलेले आहे.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पंदेकृवि, अकोला

# जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत **पश्चिम** विभागावरील परिसरातील **हिरवे गवत चराईकरीता** जाहीर लिलाव दिनांक **१३.०८.२०२६** रोजी स. **११.३०** वाजता **सामान्य विभाग** कार्यालय येथे करण्यात येत आहे. त्या लिलावाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

- **पश्चिम** विभागावरील फक्त **हिरवे गवत चराईकरीता** जाहीर लिलावात समावेश आहे.
- इच्छुक व्यापाऱ्यांनी विभागावरील हिरव्या गवताची लिलावाचे पूर्वी पाहणी करून **बंद लिफाफामध्ये लिलाव (बोली) रक्कम दि. १०.०८.२०२६ ते १२.०८.२०२६ संध्याकाळी ०६.०० वाजेपर्यंत संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला कार्यालयामध्ये जमा करावे.**
- ज्यांना लिलावामध्ये भाग घ्यावयाचा असेल त्यांना रुपये **रु.** २००० अनामत रक्कम म्हणून नगदी भरावे लागतील.
- ज्या व्यक्तींनी **रु.** २००० अनामत रक्कम भरली असेल त्यांना फक्त लिलावाच्या वेळी प्रक्षेत्रावरील ठिकाणी हजर राहता येईल व त्यांचेच लिलाव (बोली) रक्कमचे बंद लिफाफे उघडण्यात येतील. लिलाव **अनामत रक्कम भरलेल्या** व्यक्तींव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीस लिलावा दरम्यान लिलाव स्थळी थांबता येणार नाही. पहिल्या दोन जास्तीत जास्त लिलावबोली धारकांचे व्यतिरिक्त इतर व्यक्तींची अनामत रक्कम लगेच परत करण्यात येईल.
- हिरव्या गवताची अपेक्षित किंमत आल्याशिवाय लिलावाच्या बोली मान्य करणे अथवा नाकारणे हे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील. बोली बोलणाऱ्या पैकी ज्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली असेल त्याला लिलाव समिती मान्यता देईल व ह्याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला यांनी राखून ठेवलेला आहे.
- लिलावधारकास अंतिम बोलीच्या म्हणजेच लिलाव रक्कमेच्या **१० % रक्कम सुरक्षा ठेव** म्हणून **लिलावाचे दिवशीच जमा** करावी लागेल. सदर सुरक्षा ठेव रक्कम लिलावाच्या अंतिम मुदतीनंतर परत करण्यात येईल.
- लिलावधारकास लिलावाची **१०० टक्के** रोखीने संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांचेकडे हिरवे गवत चराई सुरु करण्यापूर्वी भरावे लागतील.
- ठरलेल्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्या वेळेवर बंद लिफाफे सादर केलेले व्यापारी हजर नसल्यास किंवा तीन पेक्षा कमी बंद लिफाफे असल्यास लिलाव रद्द करण्याचा अधिकार लिलाव समिती घेईल.
- लिलावधारक व प्रक्षेत्रावरील अधिकारी यांच्या मध्ये काही कारणास्तव वादविवाद निर्माण झाल्यास मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र ह्यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.
- लिलाव दिल्यानंतर नैसर्गिक आपत्ती मुळे नुकसान झाल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही तसेच उर्वरित लिलाव रक्कमे मध्ये कुठल्याही प्रकारची सुट दिल्या जाणार नाही **मंजूर झालेली अंतिम बोलीची पूर्ण रक्कम ठरलेल्या वेळेत भरणा करावी लागेल.**
- लिलाव झालेल्या हिरवे गवत चराई करणाऱ्या व्यक्तीची माहिती आधार अथवा ओळखपत्रासह संबंधित प्रभारी अधिकारी यांचेकडे जमा करावी लागेल व तीच व्यक्ती शेळीगाय व म्हैस यांना चराई,मेंढी , करु शकेल. सदर व्यक्तीला विभागातून पास दिल्या जाईल व एकावेळी जास्तीत जास्त तीन व्यक्तींची पास दिल्या जाईल.

- प्रक्षेत्रावरील हिरवे गवत शेळी, मेंढी,गाय व म्हैस चराई करताना फळबागेला हानी पोहोचणार नाही याची दक्षता लिलावधारकास घ्यावी लागेल. बागेतील झाडाचे व विद्यापीठाच्या इतर मालमतेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई लिलावधारकाकडून करण्यात येईल व ह्या बाबतचा अंतिम निर्णय संचालक , मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला यांचा राहील.
- प्रक्षेत्रावरील हिरवे गवत शेळी, मेंढी,गाय व म्हैस चराई करण्याची अंतिम तारीख ....................राहील.
- शेळी, मेंढी,गाय व म्हैस जनावरे फक्त कार्यालयाने निश्चित केलेल्या प्रक्षेत्रात व वेळेतच चारण्यास परवानगी राहील. जनावरांमुळे किंवा चारण्याच्या कामादरम्यान झालेल्या कोणत्याही अपघातास किंवा जीवित/वित्तहानीस हे कार्यालय जबाबदार रहणार नाही.
- जनावराना रात्री मुक्काम करण्यास परवानगी राहणार नाही कोणतेही नुकसान झाल्यास त्याची भरपाई लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न झाल्यास कोणतही प्रकारची पूर्व सुचेना न देता परवानगी रद्द करण्यात येईल व भरलेले रक्कम जप्त करण्याचा अधिकार कार्यालयास राहील.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पंदेकृवि, अकोला

261
7|08|2026